क्रमांक:पोअवा/आस्था./HC TO ASI/पदो.-१९/ 14602 /२०१९, वाशिम. दिनांक :- 16 SEP 2019

# आदेश

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ/१६-ब, दिनांक २९/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन आरक्षण नसलेल्या खुल्या प्रवर्गातील तसेच इतर मागास वर्गीय प्रवर्गातील खालील नमुद "पोलीस हवालदार" यांना "सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक" पदावर वेतन मॅट्रिक्स एस-१०, २९२००-९२३००/- मध्ये निव्वळ स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचा Departmental Promotion Committee ने निर्णय घेतला आहे. खालील नमुद पोलीस हवालदार यांना Departmental Promotion Committee चे निर्णयानुसार त्यांना "पोलीस हवालदार" ते "सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक" पदावर पदोन्नती स्विकारल्याचे दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | कर्मचा-यांचे नांव | प्रवर्ग | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोहवा. | ९११ | धोडबा झनकराव वाघ | खुला | पोलीस नियंत्रण कक्ष, वाशिम |
| २. | पोहवा. | ११५८ | हरिचंद्र गोपाळराव चौधरी | खुला | बॉम्ब शोधक पथक, वाशिम |
| ३. | पोहवा. | ५७३ | गणेश मधुकर करोडदे | इमाव | मोपवि., आर.सी.पी. वाहनावर |
| ४. | पोहवा. | ९५९ | विनोद श्रीराम वानखेडे | खुला | पो.स्टे., वाशिम शहर |
| ५. | पोहवा. | २६८ | पांडुरंग शंकरराव बेंदरे | खुला | पो.स्टे., मानोरा |
| ६. | पोहवा. | ५०६ | राजेंद्र जगननाथ गोदारा | खुला | पो.स्टे., जऊळका |
| ७. | पोहवा. | ५०७ | रामभाऊ यादवराव खोडके | खुला | पो.स्टे., रिसोड |
| ८. | पोहवा. | ५१८ | संजय शामराव पिंपळकर | इमाव | पो.स्टे., मालेगांव |
| ९. | पोहवा. | ५११ | दिलीप मधुकर बेलोकार | खुला | ला.प्र.वि., वाशिम |
| १०. | पोहवा. | ५३३ | हरिदास मल्हारी बोरकर | खुला | मसुप., अमानी |
| ११. | पोहवा. | ५३५ | रामेश्वर दामोदर इंगोले | खुला | पो.स्टे., वाशिम शहर |
| १२. | पोहवा. | ५२५ | संजय मनोहर नंदकुले | इमाव | स्थागुशा., वाशिम |
| १३. | पोहवा. | ५२२ | गणेश शेषराव सरनाईक | खुला | पो.स्टे., वाशिम शहर |
| १४. | पोहवा. | ५२४ | प्रकाश दिनकर सरनाईक | खुला | पो.स्टे., शिरपुर |
| १५. | पोहवा. | ५५४ | मो.इद्रीस मो.सुलतान | खुला | दविप., वाशिम |
| १६. | पोहवा. | ५५१ | गणेश किसनराव सरनाईक | खुला | मोपवि., वाशिम |

२/- वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस हवालदार यांचे विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / विभागीय चौकशी प्रलंबित असेल / सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत तसेच त्यांनी जाती दावा वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याचे निदर्शनास आल्यास नमुद पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नतीबाबत पुढील योग्यती कार्यवाही करण्यात येईल या अटीवर सदरची तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

३/- सदरचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून व महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २९/१२/२०१७ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

४/- तसेच वर नमुद पोलीस हवालदार यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय

//२//

क्रमांक:एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, तारीख: १२.०९.२०१६ अन्वये जे कर्मचारी सदरची पदोन्नती नाकारणार आहेत, अशा कर्मचाऱ्यांना दोन वर्षापर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करीता विचार करण्यात येणार नाही तसेच ज्या कर्मचा-यांने कायमस्वरुपाची पदोन्नती नाकारलेली आहे, त्यांचा पुढील कोणत्याही निवडसूचीकरिता विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

५/- ज्या पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नती स्विकारयाची नाही त्यांनी तसा विनंती अर्ज या कार्यालयास ७ दिवसाचे आंत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास सादर करावा.

६/- वर नमुद पोलीस हवालदार यांना "सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक" पदावर पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**( वसंत परदेशी )**
भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

सर्व संबंधित ठाणेदार/ शाखा प्रभारी, वाशिम जिल्हा / राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम.

२/- संबंधित ठाणेदार यांनी सदर पदोन्नतीचे आदेश सर्व कर्मचारी यांचे समोर गणनेवर वाचुन दाखवावे. तसेच ज्या पोलीस हवालदारांनी पदोन्नती स्विकारलेली आहे. त्याबाबतची नोंद स्टेशन डायरी मध्ये करुन घेवून त्यांची पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक व स्टे.डायरी च्या साना क्रमांकासह अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा. व ज्या "पोलीस हवालदार यांनी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक" पदाची पदोन्नती स्विकारली नाही त्यांचा सुध्दा अहवाल उलट टपाली या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

३/- उपरोक्त आदेशात नमूद केलेल्या ज्या पोलीस हवालदाराविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत अथवा संक्षीप्त कारवाई मध्ये निर्गमित केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही, अशा पोलीस हवालदारकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा पदोन्नतीच्या पदात भोगण्यास ते तयार नसतील अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे लेखी पूर्वसंमती विनंती अर्ज घेवुन या कार्यालयास सादर करावी जर सदर कर्मचारी यांनी आदेश प्राप्त झाल्यावर ७ दिवसाचे आत लेखी संमती सादर केले नाही तर त्यांना देण्यात आलेली शिक्षा ते पदोन्नतीचे पदात भोगण्यास तयार असतील असे समजण्यात येईल, या बाबत त्यांना लेखी समज देवुन त्याबाबतचा अहवाल उलट-टपाली या कार्यालयास सादर करावा.

४/- महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:पीएवाय १०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३, दिनांक ०६, नोव्हेंबर, १९८४ अन्वये पदोन्नतीवर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतन निश्चिती करणेबाबत विकल्प द्यावयाचा असेल तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासुन १(एक) महिन्याचे आंत द्यावा. व अशाप्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतन निश्चिती म.ना.से.(वेतन) नियम ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची वर नमुद पोलीस कर्मचारी यांनी नोंद घ्यावी. त्यांना पदोन्नती नाकारवयाची असेल तर त्यांची सात दिवसाचे आंत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

प्रत माहितीस :-

पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम/उपविभागीय पोलीस अधिकारी/वाशिम/मंगरुळपीर/कारंजा, जि.-वाशिम/पोलीस उप-अधीक्षक, आर्थीक गुन्हे शाखा, वाशिम/पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :- प्रमुख लिपीक लेखाशाखा/पत्रव्यवहार शाखा/वेतन लिपीक/विभागीय चौकशी लिपीक/आस्थालि.२ व ३/ डिपीजी लिपीक/ संगणक कक्ष पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

२/- संगणक प्रमुख यांनी सदरचे आदेश त्वरीत पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे **"संकेतस्थळावर"** सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्या यावेत. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा/रापोनि.,पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे संकेतस्थळावर **"ई-मेल"** द्वारे त्वरीत कळवावे.

प्रत समादराने अग्रेषित :-

पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती / पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, नागपुर.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.